**प्रेस नोट दिनांक ११/१०/२०२४**

**फॉरेक्स मार्केट ट्रेडींगचे नावाखाली देशभरातील शेकडो गुंतवणूकदारांचे फसवणूक करणाऱ्या बोगस कॉल सेंटरवर गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून कारवाई.**

दि.१०/१०/२४ रोजी कक्ष -०८ चे पो.उप.नि.विकास मोरे यांना गोपनीय माहिती मिळाली की, कॉन्टिक इन्फोटेक कंपनी, ऑफिस नंबर १०७, पहिला मजला, क्वॉटम टॉवर, चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम), मुंबई या ठिकाणी बोगस कॉल सेंटर चालवित आहेत. सदर कॉलसेंटर मध्ये ऑनलाईन मॅच ट्रेडर ॲप्लीकेशनद्वारे लोकांची वैयक्तिक माहिती प्राप्त करून, त्यानंतर त्यांना ऑनलाईन अप्लीकेशनद्वारे कॉल करून, युनाडेट किंगडम (इंग्लड) या देशातून VFX Markets या ब्रोकींग फर्म कंपनीतून बोलत असल्याचे सांगत असत. फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास खात्रीशीर व जास्तीत जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून गुतंवणूकदारांना ट्रेडींग करण्यास भाग पाडून त्यांच्याकडून लाखो रूपये बेकायदेशीरपणे हस्तांतरीत करून घेत होते. तसेच ट्रेडिंग करीता पुरविण्यात आलेल्या प्लॅटफॉर्मवर आरोपी स्वतःच गुंतवणूकदारास प्रथम फायदा झाल्याचे भासवत असत. त्यानंतर पुन्हा गुंतवणूकदाराकडून आणखी पैसे उकाळून त्यांचे ट्रेडिंग ॲपमध्ये नुकसान झाल्याचे भासवून गुंतवणूकदारांचे लाखो रूपये आरोपी स्वतःचे फायदयाकरीता वापरत असल्याची खात्रीशीर माहिती कक्ष ८ ला मिळालेली होती.

सदर मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कक्ष ८ मधील अधिकारी/अंमलदार यांची पथके तयार करून सदर ठिकाणी छापा घालण्यात आला. नमूद कॉल सेंटरमध्ये एकूण १४ इसम हे अनधिकृत कॉल सेंटर चालवित असलेबाबत मिळून आले. सदर ठिकाणचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला असून आरोपीतांच्या ताब्यातून एकूण ०२ लॅपटॉप, १६ डेस्कटॉप, २ मोबाईल फोन व गुन्हयाविषयी इतर कागदपत्रे असे एकूण अं.किं. २,४०,५००/- एवढया किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदर इसमाविरूध्द मालाड पोलीस ठाणेस गु.र.क्र. ८४६/२०२४ कलम- ३१६ (२), ३१६ (५), ३१९ (२), ३१८ (४) भा.न्या.सं. सह कलम २५ (क) भारतीय तार अधिनियम सह कलम ६६ (क), ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष-८, गुन्हे शाखा, मुंबई हे करीत असून नमूद गुन्हयात एकूण १४ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई), श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई), श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. विशाल ठाकूर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( डी -पश्चिम), श्री. प्रशांत राजे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष-८ चे प्रभारी पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे, पोनि श्रीकांत इंगवले, सपोनि मनोजकुमार प्रजापती, सपोनि मधुकर धुतराज, सपोनि संग्राम पाटील, पोउनि विकास मोरे, सपोउपनि शिरसाट, पोह चव्हाण, पोह किणी, पो.ह. काकडे, पो.ह.कुरकुटे, पो.ह.कांबळे, पोशि सटाले, पोशि बिडवे, पोशि साळवे, पोशि होळंबे व मपोशि भिताडे यांनी पार पाडली आहे.